फोन : (०२४६२) २२९२४२ / ४३
फॅक्स : (०२४६२) २२९२४५ / २२९३२५

Phone : (02462) 229242 / 43
Fax : (02462) 229245 / 229325

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

# ::परिपत्रक::

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. ०५/०६/२०१५ च्या पत्राच्य अनुषंगाने महाविद्यालयामध्ये विशाखा जजमेंट व महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध मनाई निवारण) अधिनियम २०१३ मधील तरतुदीनूसार महिला तक्रार निवारण समितत्यांचे योग्य प्रकारे गठण करण्यात यावे, असे कळविलेले आहे.

तरी या परिपत्राकान्वये मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पत्रामध्ये दर्शविलेल्या सुचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा कार्यअहवाल या विभागास त्वरीत पाठविण्यात यावा तसेच या अहवालाची एक प्रत मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालय, नांदेड यांना पाठविण्यात यावा.

''ज्ञानतीर्थ'' परीसर )(
विष्णुपुरी, नांदेड )(
जा. क्र.शैक्षणिक–३/२०१५–२०१६/120 )(
दिनांक : २४/०६/२०१५ )(
25 )(

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

सोबत:

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. ०५/०६/२०१५ रोजीचे पत्र.

प्रत :
१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड.
३. सिस्टीम एक्सपर्ट, यु.जी.सी. संगणककक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर बी.सी.यू.डी अंतर्गत प्रसिध्द करावे.

आ. क्र. 20 दिनांक 16/6/15
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
स्वा रा ती मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

कुलसचिव कार्यालय
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ
नांदेड-४३१६०६
आ. क्र. 1553 दिनांक 15/6/15


महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१
Web : www.dirhe.org E-mail : dhepune@yahoo.co.in
(०२०) २६१२२१११, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३


क्रमांक उशिस-२०१५ महिला तक्रार/प्रशा-१ /5418 दिनांक 5 JUN 2015

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण,
सर्व कुलसचिव अकृषी विद्यापीठे

विषय-डॉ.निलम गो-हे,वि.प.स.यांनी विधान परिषदेमध्ये विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित केलेल्या सूचनेबाबत.

संदर्भ-विउले-२०१५/(२९४/१५)/विशि-१ दिनांक ५.मे २०१५

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन पत्रसोबत जोडलेले महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय यांचे दिनांक १६.०४.२०१५ मध्ये विधान परिषद सदस्य डॉ.निलम गो-हे यांनी विधान परिषदेत पुण्यासह राज्यातील शैक्षणिक काम करणा-या महिलांवर होणा-या अत्याचा-यांच्या तक्रारीचे निराकरण करण्याकरीता विशाखा समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता याबाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडलेली आहे.

प्रस्तुत सूचनेत त्यांनी कामाच्या ठिकाणी असलेल्या महिला कर्मचारी यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने,पुण्यासह राज्यातील शैक्षणिक काम करणा-या महिलावर होणा-या अत्याचारांच्या तक्रारीचे निराकरण करण्याकरीता विशाखा समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत,परंतु त्या समित्या फक्त कागदोपत्री असून संस्थाचालक,प्राचार्य,विविध संघटना ,विविध हित संबधित गट यांच्या दबावामुळे तक्रारच नोंदवून घेतली जात नाही.असे दैनिक लोकसत्ता व पुण्यातील अनेक वृत्तपत्रांनी याबद्दल पाहणी केली असल्याचे नमुद केलेले आहे,तसेच तक्रार नोंदवायला गेलेल्या महिलांनाच धमकी दिली जाते असेही नमुद केलेले आहे.तसेच काही महाविद्यालयामध्ये तक्रार निवारण समितीमध्ये अध्यक्ष हे पुरुष असल्याचे नमुद केलेले आहे.

तरी उपरोक्त वस्तुस्थिती पाहता आपणास पुनश्चः कळविण्यात येते आपल्या अधिनस्त सर्व अनुदानित महाविद्यालये / विद्यापीठे /शासकीय संस्था /महाविद्यालये यामध्ये विशाखा जजमेंट व महिलांचे लैंगिक छळापासून सरंक्षण(प्रतिबंध मनाई निवारण)अधिनियम २०१३ मधील तरतुदीनूसार महिलातक्रार निवारण समित्यांचे योग्य प्रकारे गठण करण्यात यावे.

**अ) सदर समितीमध्ये अध्यक्षा ही महिला असावी.**

**ब) यासमितीमध्ये ५० टक्के सदस्य महिला असाव्यात.**

DA / BUP / DSW

AR. Affiliation.
18/6/15

15-6-15

mhilatakar niwarn samiti12-13

क) एक अशासकीय सदस्य महिला असावी.(अशासकीय सदस्य नसलेली समिती अधिकृत समजण्यात येणार नाही व त्यासमितीने केलेली चौकशीही ग्राहय धरली जाणार नाही )

तसेच प्रत्येक कार्यालयाने गठित केलेल्या महिला तक्रार निवारण समितीची प्रत माहीती फलकावर लावण्यात यावी,जेणेकरुन तक्रारदार व्यक्तीना तक्रार कोणाकडे करावी याबाबतची माहीती मिळेल.

*** सदर महिला तक्रार निवारण समितीचे कामकाज पुढीलप्रमाणे चालेल.***

१. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार महिलांच्या लैंगिक छळवणुकीस आळा घालण्यासाठी व कामाच्या ठिकाणी सुरक्षीत वातावरण मिळावे यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

२. कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीचे निवारण निर्धारित कालावधीमध्ये छाणनी करणे व तक्रारीच्या अनुषंगाने योग्य त्या प्राधिक-यांकडे पुढील प्रस्ताव सादर करणे.

३.लैगिंक छळवणूकीसारखे प्रकार टाळण्यासाठी कालबध्द कार्यक्रम घेणे तसेच समितीच्या नियतकालीक बैठकीत त्याबाबत वेळेवेळी आढवा घेणे.

डॉ.निलम गो-हे,वि.प.स.यांनी विधान परिषदेमध्ये विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की ,यापुर्वी आपल्या कार्यालयाकडून आपल्या विद्यापीठात /आपल्या विभागीय सहसंचालक कार्यालयाच्या कार्यकक्षेतील शासकीय व अनुदानित संस्था/महाविद्यालये यामध्ये अशा प्रकरच्या समित्या गठण केलेल्या असून त्या कार्यन्वीत असल्याबाबत संचालनालयास कळविण्यात आलेले आहे, उपरोक्त प्रस्तुत मुद्या पाहता, प्रथम प्राधान्याने प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थितीची सत्यता पडताळून वस्तुनिष्ठ अहवाल संचालनालयास ७ दिवसात सादर करण्यात यावा,जेणेकरून प्रस्तुत प्रकरणातील सविस्तर अहवाल विहीत वेळेत संचालनालयाकडून शासनास सादर करणे सुलभ होईल.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत-मा.प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर